दैनिक
आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

सुविचार

मन खंबीर असेल तर कोणतेही संकट लहान वाटते.

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 323 वा ■ सोमवार, 16 नोव्हेंबर, 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com

बजाज एलियांझ कंपनीविरोधातील पीक विम्याचा कायदेशीर लढा अंतिम टप्प्यात

पीकविम्याच्या ५७५ कोटींचा फैसला दोन दिवसांत; सर्वोच्च न्यायालयात आजपासून सुनावणी

२०२० आणि २०२१ च्या प्रकरणांकडे लाखो शेतकऱ्यांचे लक्ष

सज्जन यादव । आरंभ मराठी

धाराशिव – धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पीकविम्याशी संबंधित दोन महत्त्वपूर्ण प्रकरणांची सुनावणी या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयात होणार आहे. सन २०२० आणि २०२१ या दोन खरीप हंगामांतील पीकविमा भरपाईच्या वादावर अनुक्रमे १७ आणि १६ नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार असून, या दोन्ही प्रकरणांत मिळून सुमारे ५७५ कोटी रुपयांचा प्रश्न निकालाच्या टप्प्यावर आहे. विशेष म्हणजे, दोन्ही प्रकरणांत बजाज एलियांझ विमा कंपनीविरोधात कायदेशीर लढा सुरू आहे. पाच वर्षांपासून भरपाईच्या प्रतीक्षेत असलेल्या लाखो शेतकऱ्यांना या सुनावण्यांतून न्याय मिळणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत या निकालांचे महत्त्व अधिक वाढले आहे.

सन २०२१ मध्ये धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यावेळी बजाज एलियांझ विमा कंपनीने अग्रिम पीकविमा भरपाई म्हणून जवळपास ३५० कोटी रुपयांचे वाटप केले होते. मात्र, जिल्हा प्रशासनाने आणखी सुमारे ३५० कोटी रुपये शेतकऱ्यांना वितरित करण्याची मागणी केली होती. या मागणीला विमा कंपनीने विरोध केल्याने प्रकरण न्यायालयात गेले. या प्रकरणात विमा कंपनीने उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत पीक कापणी प्रयोगातून अधिक उत्पादन आल्याचा युक्तिवाद केला होता. त्यामुळे अतिवृष्टीमुळे प्रत्यक्षात झालेल्या नुकसानीचा विचार करूनही कंपनीने अतिरिक्त विमा भरपाई देण्यास नकार दिला होता. पीकविमा भरलेल्या सुमारे अडीच लाख शेतकऱ्यांना आणखी ३५० कोटी रुपयांची भरपाई मिळावी, अशी मागणी उच्च न्यायालयात करण्यात आली होती. मात्र, उच्च न्यायालयाने विमा कंपनीचा युक्तिवाद ग्राह्य धरत कंपनीच्या बाजूने निर्णय दिला. त्यानंतर कृषी विभागाने या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. या प्रकरणाची दुसरी सुनावणी आज, १६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे या सुनावणीत न्यायालय काय भूमिका घेते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.



दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर निकालाकडे लक्ष

सन २०२० मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झाल्यानंतर पीकविम्याच्या भरपाईसाठी शेतकऱ्यांना तब्बल पाच वर्षांपासून प्रतीक्षा करावी लागत आहे. तर २०२१ च्या प्रकरणातही शेतकऱ्यांना अतिरिक्त भरपाई मिळालेली नाही. दोन्ही प्रकरणांमध्ये विमा कंपनीविरोधात सुरू असलेल्या कायदेशीर लढ्याचा महत्त्वाचा टप्पा आता आला आहे. यंदा जिल्ह्यात पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयातील दोन्ही प्रकरणांचे निकाल शेतकऱ्यांच्या बाजूने लागल्यास त्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळू शकतो. त्यामुळे १६ आणि १७ नोव्हेंबर या दोन दिवसांकडे जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

२०२० च्या पीकविमा प्रकरणाची अंतिम सुनावणी

सन २०२० च्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे धाराशिव जिल्ह्यातील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. मात्र, बजाज एलियांझ विमा कंपनीने विविध तांत्रिक कारणांचा आधार घेत अनेक पात्र शेतकऱ्यांचे विमा दावे नाकारल्याचा मुद्दा उपस्थित झाला. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने २४ नोव्हेंबर २०२५ रोजी शेतकऱ्यांच्या बाजूने महत्त्वपूर्ण निर्णय दिला होता. न्यायालयात जमा असलेल्या ७५ कोटी रुपयांच्या रकमेसह त्यावरील व्याज मिळून सुमारे ९३ कोटी रुपये तसेच शासनाकडील १३४ कोटी रुपये पात्र शेतकऱ्यांना वितरित करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात विमा कंपनीने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. गेल्या अनेक महिन्यांपासून या प्रकरणाची सुनावणी वारंवार पुढे ढकलली जात होती. १२ जानेवारी, २ फेब्रुवारी, ६ फेब्रुवारी, १३ फेब्रुवारी, २३ फेब्रुवारी, १६ मार्च, २३ मार्च, १५ एप्रिल, २४ एप्रिल, ६ मे, २२ जुलै, ३० सप्टेंबर आणि १४ ऑक्टोबर अशा विविध तारखांना सुनावणी निश्चित झाली होती. मात्र, अंतिम निर्णय होऊ शकला नाही. आता मंगळवार, १७ नोव्हेंबर रोजी या प्रकरणाची अंतिम सुनावणी होणार आहे. या निकालातून जिल्ह्यातील ३ लाख ५७ हजार २८२ शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ९ हजार रुपये याप्रमाणे एकूण २२७ कोटी रुपयांची भरपाई मिळण्याचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे.

लक्ष्मण माहिते यांची राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेच्या रेफरी बोर्डावर निवड

आरंभ मराठी । कळंब

धाराशिव जिल्हा कबड्डी असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण तात्या माहिते यांची चिपळूण येथे आयोजित करण्यात येणाऱ्या ३६ व्या राज्यस्तरीय सबज्युनिअर व ७३ व्या वरिष्ठ गट राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेच्या रेफरी बोर्डावर निवड झाली आहे. ॲम्युचर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने त्यांना निवडीचे अधिकृत पत्र नुकतेच प्रदान करण्यात आले. लक्ष्मण माहिते हे जिल्ह्यात कबड्डी खेळाच्या प्रसारासाठी आणि विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत. कबड्डी क्षेत्रातील त्यांचे योगदान आणि अनुभव लक्षात घेऊन त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेच्या रेफरी बोर्डावर निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे धाराशिव जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून जिल्ह्यातील कबड्डीप्रेमी आणि खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या निवडीबद्दल कळंब तालुका कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी फुलचंद कदम, प्रा. साजेद चाऊस, सुबराव कांबळे, गोंदिया येथील न्यायाधीश नागेश देशपांडे, स्टेनो घाडगे, अनिल शिंदे, राजाभाऊ शिंदे, संजय मडके, परमेश्वर मोरे, अविनाश खरडकर आदींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

२१ गावांच्या पाणीप्रश्नावर प्रशासनाला महिन्याची मुदत

लेखी आश्वासनानंतर पारगावचे रास्ता रोको स्थगित

वाशी :– पारगाव जिल्हा परिषद गटातील २१ गावांचा पाणीप्रश्न मार्गी लावण्यासाठी करण्यात आलेले रास्ता रोको आंदोलन प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर महिनाभरासाठी स्थगित करण्यात आले. आमदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद सदस्या सविता तळेकर यांनी यासाठी पुढाकार घेतला. पारगाव येथील जलजीवन मिशनअंतर्गत १६०० मीटर पाइपलाइनचे काम अनेक दिवसांपासून रखडले आहे. यासह गटातील अनेक गावांच्या पाणी योजना अपूर्ण असल्याने रविवारी (दि.१५) बीड-सोलापूर महामार्गावर रास्ता रोको करण्यात आला. प्रशासनासोबत झालेल्या चर्चेत संबंधित कंत्राटदाराला पाइपलाइनचे काम तातडीने सुरू करण्याचे लेखी आदेश देण्यात आले. सोमवारपासून काम सुरू करण्याचे आश्वासनही देण्यात आले. तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता कुमटे सोमवारी २१ गावांतील बंद व अपूर्ण पाणी योजनांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर केला जाणार आहे. तांदूळवाडीसाठी कायमस्वरूपी पाणी योजना, नियमित टँकर आणि रखडलेली कामे पूर्ण करण्याच्या मागण्या कायम आहेत. प्रशासनाच्या आश्वासनांचा विचार करून आंदोलन स्थगित केले आहे. मात्र, महिनाभरात ठोस कार्यवाही झाली नाही, तर कोणतीही पूर्वसूचना न देता पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सविता तळेकर यांनी दिला. आंदोलन स्थगित झाले, संघर्ष नाही, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली.



छायाचित्र; सूरज बागल

पाणी तळाला; तुळजापूर तालुक्यात विहिरी कोरड्या

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर तालुक्यात पाणीसाठ्याने तळ गाठला असून, अनेक विहिरी कोरड्या पडल्या आहेत. विहिरींच्या तळाशी मोजकेच पाणी शिल्लक असल्याने पाणीटंचाईचे संकट आतापासूनच गंभीर होऊ लागले आहे. आगामी काळात परिस्थिती आणखी बिकट होण्याची चिन्हे असून, गावोगावी पाण्यासाठी भटकंती करण्याची वेळ येण्याची भीती आहे.

शासकीय योजनांच्या लाभासाठी ई-केवायसी. फार्मर आयडी तातडीने करा

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी अग्रीम मदतीच्या पार्श्वभूमीवर आवाहन

मुंबई :– केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कृषीविषयक तसेच अन्य शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून फार्मर आयडी तयार करून घ्यावा, असे आवाहन मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांची माहिती ॲग्रीस्टॅक प्रणालीमध्ये अद्ययावत असणे आवश्यक असून, त्याअभावी विविध योजनांचे अनुदान आणि आर्थिक मदत मिळविताना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करावी, असे शासनाने स्पष्ट केले आहे. राज्यातील शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ तसेच अन्य संकटांच्या काळात शासनाकडून आर्थिक मदत दिली जाते. याशिवाय कृषी विभाग आणि अन्य शासकीय विभागांच्या माध्यमातून विविध योजनांचे अनुदान, आर्थिक सहाय्य आणि इतर लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात येतात. या योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांना वेळेत मिळावा, यासाठी ॲग्रीस्टॅक प्रणालीच्या माध्यमातून शेतकऱ्यांची माहिती एकत्रित केली जात आहे. सध्या राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी अग्रीम मदत देण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ई-केवायसी आणि फार्मर आयडीची प्रक्रिया महत्त्वाची ठरत आहे. पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदतीची रक्कम थेट जमा होण्यासाठी आवश्यक नोंदणी आणि माहितीची पडताळणी पूर्ण असणे गरजेचे आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ई-केवायसी केलेली नाही किंवा फार्मर आयडी प्राप्त केलेला नाही, त्यांनी विलंब न करता ही प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी.

आरंभ मराठी | मनोज जरांगे पाटील यांचा इशारा; गुंजोटी येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे अनावरण

कुणबी प्रमाणपत्राचा प्रश्न मार्गी न लावल्यास २०२९ मध्ये मतदानावर बहिष्कार टाकणार

आरंभ मराठी । उमरगा

कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया गेल्या तीन ते चार महिन्यांपासून बंद करण्यात आली आहे. ही प्रक्रिया तातडीने सुरू करून प्रमाणपत्र वाटप सुरू ठेवले नाही, तर २०२९ च्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन मराठा समाजबांधवांना करणार असल्याचा इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचा अनावरण सोहळा शनिवारी (दि.१४) रात्री मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते उत्साहात पार पडला. यावेळी लाखो मराठा बांधव उपस्थित होते. यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, राजकीय नेत्यांनी ठरवले असते तर मराठा समाजाचे वाटोळे झाले नसते. आरक्षण मिळविण्यासाठी मराठा समाजाने काय पाप केले आहे? आरक्षणाच्या मागणीसाठी ५५० युवकांनी बलिदान दिले आहे. मराठा समाजातील तरुण आज ऊसतोडणी, मजुरी करून जगत आहेत. शिवरायांच्या नावाने शपथा घेऊन आरक्षण देण्याची आश्वासने दिली जातात; मात्र प्रत्यक्षात आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागत नाही. राजकीय नेत्यांनी ज्या अभिमानाने मत मागितले, त्याच अभिमानाने मराठा समाजाला आरक्षण द्यावे. मराठा समाजाला मान खाली घालून जगू देणार नाही, तर स्वाभिमानाने आणि ताठ मानेने जगण्याची शिकवण देणार असल्याचे त्यांनी सांगितले. मराठा समाजाचा कोणी अपमान केल्यास त्याला सोडणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. आपल्या विरोधात बोलण्यासाठी आश्रमशाळा आणि गोशाळेच्या खात्यावर पैसे पाठवून बदनामी करण्याचा कट रचला जात असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. या कार्यक्रमाला उमरगा नगर परिषदेचे नगराध्यक्ष किरण गायकवाड, भाजप नेते अभय चालुक्य, आमदार प्रवीण स्वामी,



भाजपचे युवा नेते तथा जिल्हा परिषद सदस्य शहाजी पाटील, काँग्रेसचे सरचिटणीस तथा जिल्हा परिषद सदस्य महेश देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार, आमदार प्रतापसिंह पाटील, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हा परिषद उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, बाबा पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती जितेंद्र शिंदे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रांतील पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी शिवशाहीर पृथ्वीराज माळी यांच्या पोवाड्याचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष जाधव यांनी केले. प्रास्ताविक पृथ्वीराज चव्हाण यांनी केले, तर अमित चव्हाण यांनी आभार मानले. राजमुद्रा प्रतिष्ठान आणि सकल मराठा समाजाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दैनिक
आरंभ मराठी

प्रतिनिधी नेमणे आहेत

अल्पावधीत वाचकांच्या पसंतीस उतरलेल्या दैनिक आरंभ मराठीचा विस्तार आता गावागावांत..
वेगवान, विश्वासार्ह आणि निःपक्ष बातमीदारीच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या आरंभ मराठीला जिल्ह्यातील विविध गावांमध्ये गाव प्रतिनिधी नियुक्त करायचे आहेत.

संपर्क : 9422068422

धाराशिव: कोंड, अंबेजवळगा, उपळा मा.,पाडोळी,बेंबळी, वडगाव सि.
कळंब: ईटकूर,डिकसळ, नायगाव, खामसवाडी, मोहा, दहिफळ, मस्सा
वाशी: पारगाव,तेरखेडा, मांडवा, बावी
लोहारा: कानेगाव, माकणी, सास्तूर,
भूम: ईट, सुकटा, वालवड, आष्टा, माणकेश्वर
तुळजापूर: सिंदफळ, काक्रंबा, जळकोट,
मंगरूळ, काटी, काटगाव, शहापूर, नंदगाव
परंडा: शेलगाव, अनाळा, जवळा नि., डोंजा, लोणी, सोनारी
उमरगा: कवठा, बलसूर, कुन्हाळी, तुरोरी, गुंजोटी, कदेर, माडज

कार्यालय: दैनिक आरंभ मराठी, सुकर्मा कॅपिटल, जिजाऊ चौक, धाराशिव

शेतकऱ्यांची परीक्षा घेणारी डिजिटल व्यवस्था

शेती करायची शेतकऱ्याने, पिकांची काळजी घ्यायची शेतकऱ्याने, निसर्गाच्या लहरीपणाशी झुंजायचेही शेतकऱ्याने आणि आता सरकारी नोंदींच्या प्रक्रियेतही अडकायचे शेतकऱ्यानेच. महाराष्ट्रात ई-पीक पाहणीच्या नोंदणीसाठी सरकारला पुन्हा मुदतवाढ द्यावी लागली, ही केवळ तांत्रिक अडचणीची बाब नाही, तर सरकारी यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करणारी घटना आहे. राज्यातील ३ कोटी ४५ लाख शेतकऱ्यांपैकी सुमारे ३ कोटी २० लाख शेतकऱ्यांची पीक पाहणी पूर्ण झाली असून उर्वरित २५ लाख शेतकऱ्यांसाठी ३० नोव्हेंबरपर्यंत मुदत वाढविण्यात आली आहे. मोबाईल नेटवर्क नसलेल्या भागांत ऑफलाइन नोंदणीची सुविधाही देण्यात आली आहे. हा निर्णय दिलासादायक असला तरी इतक्या मोठ्या संख्येने शेतकऱ्यांची नोंदणी अपूर्ण राहण्यामागची कारणे गांभीर्याने तपासण्याची गरज आहे. डिजिटल क्रॉप सर्व्हेच्या माध्यमातून पीक नोंदी अधिक अचूक करण्याचा सरकारचा उद्देश चुकीचा नाही. शेतीच्या नोंदी पारदर्शक व्हाव्यात, सरकारी योजनांचा लाभ योग्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा आणि पीक नुकसानीची माहिती व्यवस्थित उपलब्ध व्हावी, यासाठी तंत्रज्ञानाचा वापर आवश्यकच आहे. मात्र, तंत्रज्ञान आणताना जमिनीवरील वास्तवाचा विसर पडता कामा नये. ग्रामीण भागातील अनेक गावांत मोबाईल नेटवर्कची समस्या आहे. सर्व्हर बंद पडणे, जिओ लोकेशनमधील त्रुटी, गावांच्या नकाशांतील तफावत आणि गट क्रमांक उपलब्ध नसणे अशा अडचणींमुळे शेतकऱ्यांची नोंदणी रखडल्याचे समोर आले आहे. यंत्रणेतील त्रुटींची शिक्षा मात्र शेतकऱ्याने का भोगावी? पीक पाहणीची नोंद ही केवळ सातबाऱ्यावरील एक नोंद नाही. पीक विमा, नुकसानभरपाई आणि शासकीय योजनांच्या लाभासाठी तिचे महत्त्व आहे. त्यामुळे तांत्रिक कारणाने नोंदणी राहिल्यास शेतकऱ्याचे नुकसान होऊ नये, याची जबाबदारी प्रशासनाने घेतली पाहिजे. केवळ मुदतवाढ देऊन प्रश्न सुटणार नाही. गावपातळीवर तलाठी आणि कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांना आवश्यक सुविधा देऊन नोंदणीची प्रक्रिया प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी लागेल. सरकारने ऑफलाइन नोंदणीचा पर्याय उपलब्ध करून दिला, ही स्वागतार्ह बाब आहे. मात्र, हा पर्याय केवळ घोषणेपुरता राहता कामा नये. शेतकऱ्यांना त्याची माहिती मिळाली पाहिजे आणि प्रत्यक्ष नोंदणीसाठी संबंधित कार्यालयांत अडवणूक होता कामा नये. पीक पाहणीच्या प्रत्येक हंगामात मुदतवाढ देण्याची वेळ येत असेल, तर व्यवस्थेचे मूल्यमापन करण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्याला तंत्रज्ञानाचा विरोध नाही; पण तंत्रज्ञानाच्या नावाखाली त्याच्या अडचणी वाढवण्याला विरोध आहे. सरकारी यंत्रणा शेतकऱ्यांच्या सोयीसाठी असते, शेतकऱ्यांनी यंत्रणेच्या सोयीसाठी हेलपाटे मारावेत यासाठी नाही. डिजिटल महाराष्ट्राच्या घोषणा करताना गावातील नेटवर्क, शेतकऱ्याचा स्मार्टफोन आणि त्याला मिळणारी प्रत्यक्ष मदत यांचाही विचार झाला पाहिजे. अन्यथा कागदावरची प्रगती वाढत राहील आणि शेतकरी मात्र सरकारी प्रक्रियेतच अडकून राहील.

गावाकडची बिकट दुष्काळी परिस्थिती



बबन दामोदर गुळवे
उमरगा कोटं ता.अहमदपूर जि.लातूर
मो.९५४५४४२६४८.



दिवाळी सणाला गावाकडे गेल्यावर दुष्काळी परिस्थिती लगेचच जाणवली. नदी, नाले, ओढे कोरडेठाक पडले होते. शेत शिवारात हिरवळ कोठेच दिसत नव्हती. सर्व शेतकऱ्यांच्या शेतात फुल न आलेले फक्त तुरीचे पिक उभे होते. पाण्याविना तुरीच्या पिकांचा खराटा झालेला दिसत होता. पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत होते. अशा बिकट परिस्थितीत दिवाळी सण साजरा करणे अवघड होते.त्यामुळे प्रत्येक घरी विकतचे पाणी घेणे चालू होते.खाजगी टॅंकरवाले चापोली येथील बोअरचे पाणी आणून गावात जास्त भावाने विकत होते.प्रत्येक नागरिकाला ऐन दिवाळीत पाणी विकत घेण्याची वेळ आल्याचे पाहून मनाला खूप वेदना होत होत्या.

दुष्काळामुळे दिवाळी सणात एवढी बिकट परिस्थिती यापुर्वी कधीच पाहिली नव्हती.दुष्काळाची झळ पदोपदी जाणवत होती.लोकांच्या चेहऱ्यांवरील हास्य गायब झाले होते.दिवाळी सण साजरा करण्याचा उत्साह कोठेही दिसत नव्हता.जिकडे तिकडे शांतता जाणवत होती.घरोघरी लावले जाणारे उंचच उंच आकाशकंदील या दिवाळीत मोठ्या संख्येने दिसत नव्हते.दिव्यांची रोषणाई कमी झाली होती.

महागाईचे संकट स्पष्टपणे दिसत होते.इतर वर्षी दिवाळीच्या फराळाला आग्रहाने बोलावणारे यावर्षी गप्पगार होते. अतिशय साध्या पद्धतीने दिवाळी सण साजरा केला गेला.जे लोक निर्दयी, व्यसनी व भावनाहीन होते त्यांनीच महागडे व मोठ्या आवाजाचे फटाके फोडून नेहमीप्रमाणे हवा प्रदूषित केली.

फार थोड्या घरच्या लेकी दिवाळी सणाला माहेरी आल्या होत्या परंतु नवीन साडीचोळी विना आणि नवीन कपड्याविना सासरी नांदायला गेल्या. कधी नव्हे तो यावर्षी ऐन दिवाळी सणात दुष्काळाचे सावट गडद झालेले आणि मानव जमातीला आर्थिक संकटात ढकलून मिष्किल हास्य करताना दिसत होते.दिवाळी संपली पण दिवाळीचा उत्साह व आनंद कोठेच दिसला नाही.दिवाळी आली आणि दिवाळी गेली.आता थंडी थोडीफार जाणवत आहे. थंडी वाढली आणि पाण्याचा वापर काटकसरीने सुरू झाला आहे.जेव्हा थंडी ओसरेल तेव्हा दुष्काळ तोंड आ वासून उभा टाकलेला दिसेल.

माणसं जगतील कसेही पण मुक्या जनावरांचे काय ?त्यांच्या चाऱ्या पाण्याची सोय कशी करावी ?हा सर्व शेतकऱ्यांना प्रश्न पडला आहे.उरले सुर्वे पशुधन जगवायचे कसे हा प्रश्न सगळ्यांनाच भेडसावत आहे. अशा बिकट दुष्काळी परिस्थितीत काही लोक मस्तवालपणे जगताना दिसत होते. तहान लागल्यावर प्यायला मिळत नव्हते पण दारू पिणारे लोक दररोज पाणी पाउच विकत घेऊन नियमितपणे दारू पित होते.

वाईट स्वभावाची माणसं त्यांचा वाईट स्वभाव सोडून द्यायला तयार नाहीत.स्वार्थी माणसं त्यांचा स्वार्थ त्यागायला तयार नाहीत.आपापसांतील मतभेद व भांडणतंटे विसरून माणुसकीला जपत माणसांसारखे वागणे अपेक्षित असताना बहुतांश माणसे दुष्काळाच्या बिकट परिस्थितीत राक्षसी कृत्ये करताना दिसत होते.

हे पाहून मनाला वेदना होत होत्या.

कितीही मोठे संकट ओढावले तरीही,भीषण दुष्काळ पडला असला तरीही सगळ्यांनी अंतर्मुख होऊन आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

पण आत्मपरीक्षण करायला कोणीच तयार नाही. दुष्काळ का पडला आणि पाऊस का पडला नाही ?याचा विचार करून भविष्यात असा भयानक दुष्काळ पडणार नाही यासाठी पर्यावरण पूरक ठोस कृती करण्याची आणि शक्य होतील तेवढे झाडे लावून ती झाडे जगवणे काळाची गरज बनली आहे.तेव्हा आपण सगळ्यांनी एकत्र येऊन झाडे लावूया,झाडे जगवूया आणि कोरडा दुष्काळ हटवूया!

भारतीय सण आणि उत्सवाच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता अधिक दृढ करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई, :- भारतीय सण आणि उत्सव हे आपल्या प्राचीन आणि सनातन संस्कृतीचा आविष्कार आहेत. समाजातील सर्व घटकांना एकत्र आणून राष्ट्रीय एकात्मता अधिक दृढ करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करतात, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. जुहू चौपाटी येथे आयोजित भव्य छठपूजा महोत्सवात सहभागी होऊन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपस्थित भाविकांना छठपर्वाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार अमित साटम, माजी आमदार कृपाशंकर सिंह, छठपूजेचे आयोजक मोहन मिश्रा, दिवाकर मिश्रा आदी मान्यवर उपस्थित होते.

छठपूजेच्या निमित्ताने भक्तीचा महासागर

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छठपूजेच्या निमित्ताने जुहू चौपाटीवर आज पाण्याचा अथांग सागर आणि भक्तांचा महासागर असे दोन सागर एकाच वेळी पाहायला मिळत आहेत. सूर्यनारायणाला अर्घ्य अर्पण करण्यासाठी आणि छठी मैयाचा आशीर्वाद घेण्यासाठी हजारो भाविक श्रद्धेने एकत्र आले आहेत.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सूर्य हा ऊर्जेचा प्रमुख स्रोत असून त्याच्या प्रकाशामुळेच सृष्टीतील जीवसृष्टी आणि वनस्पतींचे जीवन शक्य होते. मानवी जीवन, शेती आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी सूर्यनारायणाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा छठपर्व हा महत्त्वाचा उत्सव आहे. या पूजेत मावळत्या आणि उगवत्या अशा दोन्ही सूर्यांना अर्घ्य दिले जाते. सूर्यनारायण, जल आणि छठी मैया कोणताही भेदभाव करत नाहीत. जात, धर्म, भाषा, प्रांत किंवा आर्थिक परिस्थिती यांचा विचार न करता श्रद्धेने अर्घ्य अर्पण करणाऱ्या प्रत्येकाला आशीर्वाद मिळतो, ही या पर्वाची व्यापक शिकवण आहे.

पुढील पाच ते दहा वर्षांत गडचिरोली देशाची 'स्टील सिटी'; एक लाख स्थानिक युवकांना रोजगार देण्याचे उद्दिष्ट

गडचिरोली : - नक्षलवादाच्या प्रभावातून बाहेर पडत गडचिरोली जिल्हा विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करत आहे. सुरक्षा, उद्योग, शिक्षण, रोजगार आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रांत होत असलेल्या परिवर्तनाची यशोगाथा देशभर पोहोचविण्यासाठी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स आणि कंटेंट क्रिएटर्सनी पुढाकार घ्यावा. प्रत्यक्ष अनुभव आणि वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे गडचिरोलीची बदलती ओळख डिजिटल माध्यमांतून देशासमोर मांडावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. गडचिरोली पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर काल रात्री आयोजित 'गडचिरोली डिजिटल डेमोक्रसी डायलॉग' कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांनी देशाच्या विविध राज्यांतून आलेल्या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स आणि कंटेंट क्रिएटर्सशी मुक्त संवाद साधला. नक्षलवाद निर्मूलन, माओवाद्यांचे आत्मसमर्पण, औद्योगिक विकास, आदिवासींचे हित, रोजगार, पायाभूत सुविधा, भूसंपादन, युवकांचे नेतृत्व आणि सोशल मीडियाच्या भूमिकेबाबत विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी सविस्तर उत्तरे दिली.

नक्षलवादाच्या छायेतून विकासाच्या नव्या पर्वाकडे आदिवासी समाजाची वाटचाल

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन



गडचिरोली :- नक्षलवादी हिंसाचाराच्या प्रभावातून बाहेर पडत देशातील आदिवासीबहुल भाग विकासाच्या नव्या पर्वात प्रवेश करीत आहेत. दुर्गम गावांपर्यंत शिक्षण, आरोग्य, निवास, रोजगार आणि पायाभूत सुविधांचा विस्तार होत असून आदिवासी समाजाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडत आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त गडचिरोली येथील जिल्हा क्रीडा संकुलात आयोजित जनजातीय गौरव दिनाच्या राष्ट्रीय सोहळ्यात प्रधानमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले. यावेळी त्यांच्या हस्ते देशभरातील सुमारे तीन हजार कोटी रुपये खर्चाच्या २४६ विकास प्रकल्पांचे उद्घाटन व भूमिपूजन करण्यात आले. तसेच महाराष्ट्र, गुजरात आणि तेलंगणा येथील तीन आदिवासी लाभार्थ्यांशी संवाद साधून योजनांमुळे त्यांच्या जीवनात झालेल्या बदलांची माहिती घेतली. या सोहळ्याला राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय आदिवासी कार्य मंत्री जुएल ओराम, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री दुर्गादास उईके, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वूईके, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आदिवासी विकास राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्यसभा सदस्य माया इवनाते, आमदार धर्मरावबाबा आत्राम, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, माजी खासदार अशोक नेते, केंद्रीय आदिवासी कार्य मंत्रालयाच्या सचिव रंजना चोप्रा यांच्यासह लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आणि मोठ्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाल्या.

आदिवासी समाजाच्या गौरवशाली इतिहासाला राष्ट्रीय सन्मान – प्रधानमंत्री

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणाची सुरुवात 'जोहार' या पारंपरिक अभिवादनाने केली. गडचिरोलीतील मोठ्या जनसमुदायाचे आणि आदिवासी संस्कृतीचे कौतुक करत त्यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्यासह क्रांतिवीर बाबूराव शेडमाके, राघोजी भांगरे, खाज्या नाईक, राणी दुर्गावती, टंट्या भिल्ल आणि अन्य आदिवासी स्वातंत्र्ययोद्ध्यांच्या योगदानाचे स्मरण केले. नक्षलवादी हिंसाचारामुळे अनेक दशके आदिवासी समाजाच्या विकासात अडथळे निर्माण झाले. मात्र, सुरक्षा यंत्रणांचे प्रयत्न आणि केंद्र व राज्य शासनाच्या विकासाभिमुख धोरणांमुळे परिस्थितीत मोठा बदल होत आहे. पूर्वी हिंसाचाराच्या छायेत असलेल्या भागांमध्ये आता शाळा, रस्ते, आरोग्य सुविधा, उद्योग आणि रोजगाराच्या संधी निर्माण होत असल्याचे प्रधानमंत्र्यांनी सांगितले.गरिबी निर्मूलनाच्या क्षेत्रात देशाने महत्त्वपूर्ण प्रगती केली असून विकासाच्या प्रक्रियेत मागे राहिलेल्या समाजघटकांना प्राधान्य देण्यात येत आहे. 'वंचितों को वरीयता' या धोरणानुसार दुर्गम आदिवासी वस्त्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्यावर भर असल्याचे त्यांनी नमूद केले.

पाणी जपून वापरा; थेंबाथेंबातूनच भविष्य सुरक्षित



प्रा. संजय बडे सहाय्यक
प्रा. दहेगाव ता. वैजापूर
..(७८८८२९७८५९)



पाणी हे जीवनाचे मूलभूत साधन आहे. पृथ्वीवर पाण्याचे प्रमाण मोठे असले, तरी पिण्यायोग्य आणि वापरण्यायोग्य गोड्या पाण्याचे प्रमाण अत्यंत मर्यादित आहे. मानवी जीवन, शेती, पशुधन, उद्योग आणि पर्यावरण या सर्वांचे अस्तित्व पाण्यावर अवलंबून आहे. असे असतानाही पाण्याचा अमर्याद आणि निष्काळजीपणे होणारा वापर चिंतेचा विषय बनला आहे. आज पाण्याची उपलब्धता ही केवळ नैसर्गिक बाब राहिलेली नसून ती भविष्यातील अस्तित्वाची मोठी समस्या बनत आहे. त्यामुळे पाणी जपून वापरणे ही काळाची गरज आहबदलते हवामान, अनियमित पाऊस, वाढते तापमान, भूजल पातळीत होणारी घट आणि पाण्याचे प्रदूषण यामुळे पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होत आहे. अनेक गावांमध्ये उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. काही ठिकाणी नागरिकांना पाण्यासाठी दूरवर भटकंती करावी लागते. दुसरीकडे शहरांमध्ये पाण्याचा बेसुमार वापर, गळणारे नळ, वाहन धुण्यासाठी होणारी पाण्याची उधळपट्टी आणि पाण्याचे अयोग्य नियोजन दिसून येते. एकीकडे पाण्यासाठी संघर्ष सुरू असताना दुसरीकडे पाण्याचा अपव्यय होणे ही निश्चितच दुर्दैवी बाब आहे..महाराष्ट्राचा विचार करता राज्यात पावसाचे प्रमाण असमान आहे.कोकणात मुसळधार पाऊस पडतो, तर मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भाग कायम दुष्काळाच्या छायेत असतात. पावसाने ओढ दिली की, पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करावे लागतात. लातूरसारख्या शहराला रेल्वेने पाणी पुरवण्याची वेळ आली होती, हे आपण विसरू शकत नाही. धरणांमध्ये गाळ साचल्याने त्यांची पाणी साठवण क्षमता कमी झाली आहे तर भूजलाचा बेसुमार उपसा झाल्याने विहिरी आणि बोअरवेल कोरड्या पडत आहेत. पाणीटंचाई ही मानवनिर्मित समस्या आहे. या संकटामागे अनेक सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय कारणे आहेत. वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे पिण्यासाठी, घरगुती वापरासाठी आणि अन्नधान्य उत्पादनासाठी पाण्याची मागणी प्रचंड वाढली आहे. काँक्रीटच्या जंगलांमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याचे मार्ग बंद झाले आहेत. भूजलाचा अतिरेकी उपसा, असमान आणि अनियमित पाऊस, शेतीमधील पारंपरिक आणि चुकीच्या सिंचन पद्धती इत्यादीमुळे जलसंकट निर्माण झाले आहे. यावर उपाय म्हणजे पाण्याचा जपून वापर करणे. पिण्याच्या पाण्याने वाहने धुणे किंवा अंगणात सडा घालणे टाळावे. नळाला तोट्या बसवाव्यात. पाहुण्यांना किंवा स्वतःला पिण्यासाठी पाणी घेताना पेला पूर्ण न भरता गरजेपुरतेच घ्यावे. पेल्यामध्ये उरलेले पाणी सिंकमध्ये ओतून न देता झाडांना घालावे. वॉटर प्युरिफायरमधून बाहेर पडणारे टाकाऊ पाणी वाया जाऊ देऊ नये. ते एका बादलीत जमा करून फरशी पुसण्यासाठी, कपडे धुण्यासाठी किंवा शौचालयात वापरता येते. जलस्रोतांचे जलपुनर्भरण करावे. घराच्या छतावर पडणारे पावसाच्या पाण्याने जलस्रोतांचे पुनर्भरण करावे. मानवाने विज्ञानाच्या भरवशावर अनेक शोध लावले असले, तरी आजपर्यंत त्याला पाणी तयार करता आले नाही. पाण्यासाठी आपल्याला पावसावरच अवलंबून राहावे लागणार आहे. तेव्हा, वृक्ष लागवड व संवर्धन केले पाहिजे. पावसाचे पाणी जास्तीत जास्त जमिनीत मुरविले पाहिजे. पाण्याचा वापर पैशासारखा करायला शिकले पाहिजे, एवढेच यानिमित्ताने सांगावेसे वाटतशेती हा पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर करणारा महत्त्वाचा क्षेत्र आहे. पारंपरिक पद्धतीने पिकांना पाणी देताना मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होतो. त्यामुळे ठिबक आणि तुषार सिंचनासारख्या आधुनिक पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. पिकांच्या गरजेनुसार पाणी देणे, कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्राधान्य देणे आणि पावसाच्या पाण्याचे संकलन करणे यामुळे पाण्याची बचत होऊ शकते. शेततळी, बंधारे, नाला खोलीकरण आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य दिल्यास भूजल पातळी वाढण्यास मदत होईल.पाणी बचतीची जबाबदारी केवळ सरकार किंवा प्रशासनाची नाही, तर प्रत्येक नागरिकाची आहे. दात घासताना नळ सुरू ठेवणे, आंघोळीसाठी गरजेपेक्षा जास्त पाणी वापरणे, घरातील नळ गळत असतानाही त्याकडे दुर्लक्ष करणे अशा छोट्या चुका मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय घडवतात. घरगुती वापरात पाणी जपून वापरणे, पावसाचे पाणी साठवणे, वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणे आणि पाण्याचे स्रोत स्वच्छ ठेवणे या सवयी प्रत्येकाने अंगीकारल्या पाहिजेतशाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती आणि सामाजिक संस्थांनी पाणी बचतीबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच पाण्याचे महत्त्व रुजवले पाहिजे.गावागावांत जलसंधारणाच्या चळवळी उभ्या राहिल्या पाहिजेत. शहरांमध्ये पावसाचे पाणी साठवण्याची व्यवस्था बंधनकारक करण्याबरोबरच सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यावर भर दिला पाहिजे. प्रशासनाने पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करून पाण्याची गळती आणि चोरी रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणेही तितकेच महत्त्वाचे आहपाण्याचा प्रश्न हा केवळ आजचा प्रश्न नाही, तर तो येणाऱ्या पिढ्यांच्या भविष्याशी जोडलेला आहे. आज आपण पाण्याचा अपव्यय केला, तर उद्या आपल्या मुलांना आणि नातवंडांना पाण्यासाठी संघर्ष करावा लागेल. त्यामुळे पाणी ही अमर्याद उपलब्ध असलेली संपत्ती नसून ती जपून वापरण्याची नैसर्गिक देणगी आहे, याची जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे.शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, पाणी वाचविण्यासाठी मोठ्या योजना किंवा घोषणांचीच गरज नाही, तर प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनातील छोट्या कृतीही महत्त्वाच्या आहेत. प्रत्येक थेंबाचे मोल ओळखून पाण्याचा काटकसरीने वापर केला, तरच जलसंकटावर मात करणे शक्य होईल. आज पाणी जपले तरच उद्या जीवन जगता येईल. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे ही केवळ जबाबदारी नाही, तर पुढील पिढ्यांप्रती आपले कर्तव्य आहे. म्हणूनच संकल्प करूया—पाणी जपूया, जीवन वाचवूया!

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-MAHMAR /2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).

धाराशिवमध्ये भगवान बिरसा मुंडा यांचे भव्य स्मारक उभारणार; शहरातील चौकाला नाव देणार

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची घोषणा; नगरपालिकेला ठराव घेण्याच्या सूचना





आरंभ मराठी । धाराशिव

आदिवासी, वंचित आणि शोषित समाजाच्या हक्कांसाठी ब्रिटिश सत्तेविरुद्ध संघर्ष करणारे क्रांतिकारक भगवान बिरसा मुंडा यांचा गौरवशाली इतिहास आता धाराशिवच्या भूमीतही जपला जाणार आहे.

जिल्ह्यात आजपर्यंत भगवान बिरसा मुंडा यांचे एकही स्मारक उभारण्यात आलेले नसल्याची बाब समोर आल्यानंतर जिल्ह्यात त्यांचे भव्य स्मारक उभारण्याचा संकल्प आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला. तसेच धाराशिव शहरातील एका चौकाला भगवान बिरसा मुंडा यांचे नाव देण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली.

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार पाटील यांच्या हस्ते बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थितांनी घोषणाबाजी करत या महामानवाला आदरांजली वाहिली. यावेळी नागरिकांनी शहरातील एका चौकाला भगवान बिरसा मुंडा यांचे नाव देण्याची मागणी केली.

त्यावर आमदार पाटील यांनी जिल्ह्यात त्यांच्या नावाचे स्मारक आहे का, अशी विचारणा केली. जिल्ह्यात एकही स्मारक नसल्याचे समजल्यानंतर त्यांनी ही उणीव दूर करण्यासाठी भव्य स्मारक उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. बिरसा मुंडा यांचा संघर्ष हा केवळ एका समाजापुरता मर्यादित नसून अन्यायाविरुद्ध लढण्याची, स्वाभिमानाने जगण्याची आणि आपल्या हक्कांसाठी ठामपणे उभे राहण्याची प्रेरणा देणारा आहे.

त्यांचे विचार आणि कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, असे आमदार पाटील यांनी सांगितले. या स्मारकाच्या उभारणीसाठी महाराष्ट्र शासन, नगरपालिका प्रशासन, जिल्हावासीय आणि समाजातील सर्व घटकांच्या सहभागातून प्रयत्न करण्यात येणार आहेत.

यासाठी लवकरच आवश्यक कायदेशीर प्रक्रिया सुरू केली जाईल. नगराध्यक्ष नेहाताई काकडे आणि सर्व नगरसेवकांनी पुढील बैठकीत स्मारक उभारणी व चौक नामकरणाबाबत सर्वानुमते ठराव घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचनाही आमदार पाटील यांनी दिल्या.

भगवान बिरसा मुंडा यांचे स्मारक म्हणजे केवळ दगड-मातीची वास्तू नसून अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा, स्वाभिमानाचा संदेश आणि वंचितांच्या संघर्षाचा सन्मान असेल. धाराशिवच्या सार्वजनिक जीवनात त्यांच्या विचारांना मानाचे स्थान मिळवून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमास जिल्हाधिकारी किर्तीकिरण पुजार, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, आदिवासी पारधी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष सुनील काळे, सतीश दंडनाईक, ॲड. नितीन भोसले, नगराध्यक्षा नेहाताई काकडे, नगरसेवक अमित शिंदे, राजाभाऊ पवार, वंदना पवार, अभिजित काकडे, राहुल काकडे, सिद्धार्थ बनसोडे, रवी मुंडे, विलास लोंढे, धनंजय पाटील, अलकाताई पारवे, आदिवासी पारधी महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापू पवार, कमलाकर पवार, दादा पवार, नाना पवार, संजू पवार, छगन पवार, जितेंद्र काळे, अरुण काळे, दिलीप चव्हाण, गणेश पवार यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बालाघाट मॅरेथॉनमध्ये 1,500 धावपटूंचा सहभाग

सेरेंटिका रिन्यूएबल्सचे पाठबळ; प्रशासकीय अधिकाऱ्यांसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती



आरंभ मराठी । बीड

बालाघाटच्या डोंगररांगांमध्ये आयोजित बालाघाट हिल हाफ मॅरेथॉन २०२६ च्या पाचव्या पर्वाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सेरेंटिका रिन्यूएबल्सच्या पाठबळाने योग प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने आयोजित या स्पर्धेत तब्बल १,५०० धावपटूंनी सहभाग घेतला. रविवारी सकाळी श्री ज्योतिबा मंदिर परिसरातून स्पर्धेला सुरुवात झाली.

२१.१ किलोमीटर, १० किलोमीटर आणि ५ किलोमीटर अशा तीन गटांत ही स्पर्धा पार पडली. छत्रपती संभाजीनगरचे महापालिका आयुक्त अमोल येडगे यांनी २१ किलोमीटरची हाफ मॅरेथॉन पूर्ण केली.

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय व पोलीस अधिकाऱ्यांनीही सहभाग घेतला.

सेरेंटिका रिन्यूएबल्सचे टी. एन. हेमनाथन यांनी स्थानिक विकासासोबत आरोग्य आणि क्रीडा उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची कंपनीची भूमिका स्पष्ट केली. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यातील कळंब, वाशी व भूम तालुक्यांत ४३० मेगावॅट, तर धाराशिव व तुळजापूर तालुक्यांत ४०० मेगावॅट क्षमतेचे पवनऊर्जा प्रकल्प कंपनीकडून विकसित करण्यात येत आहेत.

मांडवा शाळेला अत्याधुनिक वॉटर फिल्टर भेट

ॲक्वा लाईफ केअर फाउंडेशनचा पुढाकार; विद्यार्थ्यांना मिळणार दररोज १४० लिटर स्वच्छ पाणी



आरंभ मराठी । वाशी

वाशी तालुक्यातील मांडवा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी पुणे येथील ॲक्वा लाईफ केअर फाउंडेशनच्या वतीने शाळेला अत्याधुनिक वॉटर फिल्टर भेट देण्यात आला.

दररोज १४० लिटर पाणी शुद्ध करण्याची क्षमता असलेल्या या फिल्टरचे मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. दिवाळी भाऊबीज आणि शाळेच्या माजी विद्यार्थी मेळाव्याचे औचित्य साधून हा उपक्रम राबविण्यात आला. फाउंडेशनचे किरण दादाराव रणदिवे यांचा शाळेच्या वतीने गौरव करण्यात आला. तसेच उपस्थित ग्रामस्थ आणि पालकांचाही सन्मान करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे भक्तराज दिवाने उपस्थित होते. त्यांनी शाळा टिकविण्यासाठी ग्रामस्थ आणि पालकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. मुख्याध्यापक ठाकूर यांनी प्रास्ताविकातून शाळेची गुणवत्ता, भौतिक सुविधा आणि भविष्यातील गरजांची माहिती दिली. शाळेच्या विकासासाठी भविष्यातही आवश्यक त्या सुविधा सर्वांनी एकत्रितपणे उपलब्ध करून देण्याचा निर्धार यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. शाळा आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीत होत असलेला बदल पाहून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे आभार बालाजी पवार यांनी मानले

कार्तिकी एकादशीसाठी श्री संत अण्णा महाराज पालखी दिंडीचे मेंढा येथून प्रस्थान

आरंभ मराठी । तेर



प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही कार्तिकी एकादशीच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी श्री संत अण्णा महाराज यांच्या पालखी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवारी (दि.१४) सकाळी १० वाजता मेंढा येथील श्री विठ्ठल मंदिरातून पालखीचे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. विठ्ठल नामाचा गजर, भजन आणि कीर्तनाच्या स्वरांनी परिसर दुमदुमून गेला असून वारकरी आणि ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. पालखी सोहळ्याचा पहिला मुक्काम बेंबळी येथे असणार आहे. त्यानंतर तुळजापूर, काटी, नरखेड, सारोळा आणि तुंगत या गावांमधून मार्गक्रमण करीत पालखी पंढरपूर येथे पोहोचणार आहे. दि. २०, २१ आणि २२ नोव्हेंबर असे तीन दिवस पालखीचा मुक्काम पंढरपूर येथील जलाराम बाबा मठात राहणार आहे. पंढरपूर येथील मुक्कामानंतर पालखी येवती, अनगर, धानोरा, वैराग, आंबेहोळ आणि सारोळा या गावांमधून परतीचा प्रवास करणार असून दि. २९ नोव्हेंबर रोजी मेंढा येथील मंदिरात पालखीचे आगमन होणार आहे. या पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांसाठी चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. संतांच्या नामस्मरणात, भजन-कीर्तनात आणि विठ्ठल भक्तीच्या आनंदमय वातावरणात पार पडणाऱ्या या सोहळ्यात वारकरी व भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मेंढा येथील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

तेर येथे 1984 च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा; सेवानिवृत्त सहकाऱ्यांचा गौरव



आरंभ मराठी । तेर

धाराशिव तालुक्यातील तेर येथे १९८४ साली दहावीच्या वर्गात शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने स्नेहमेळावा व सेवापूर्ती सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून सेवानिवृत्त झालेल्या सहकाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच अन्य क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्रभाकर घाटुळे, विकास चौगुले, सतीश वाघे, सतीश वाघमारे, आण्णासाहेब बिटे, प्रेमराज पाटील आणि महादेव मुळे यांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. खुशालचंद बाहेती होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सत्कारमूर्तींच्या कार्याचा गौरव करून त्यांच्या सेवाभावाचे आणि सामाजिक योगदानाचे कौतुक केले. समाजाप्रती बांधिलकी जपत केलेले कार्य इतरांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

सत्कारमूर्तींनीही आपल्या सेवाकाळातील अनुभवांना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मल्हार वाघे, विशाखा वाघे, प्रगती वाघमारे, विक्रांत वाघमारे आणि सदाशिव धुपेकर यांनी मनोगत व्यक्त केले. तब्बल चार दशकांनंतर एकत्र आलेल्या मित्रांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

सुख-दुःखाच्या आठवणींची देवाणघेवाण करत स्नेहबंध अधिक दृढ केले. यावेळी सुनील पतंगे, शशिकांत हाजगुडे, आगतराव बुकन, हेमंत व्यास, संजय खरात, राजेंद्र कोळपे, राजेंद्र घोगरे, पद्माकर फासे, विद्याधर दीक्षित, आनंद चंदेले, युवराज इंगळे, सुनील माने, प्रताप नाईकवाडी, भगवान खंदारे, सुनंदा पांढरे, सरू आगाशे, संगीता कानाडे, तनुजा चौगुले, मीरा चौगुले, अनिता घाटुळे, अनुराधा पाटील, अनिता बिटे, वनिता वाघे, उषा वाघमारे, शैला मुळे यांच्यासह बॅचमधील अनेक माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधाकर फासे यांनी केले, तर डी. डी. माने यांनी आभार मानले.

आरंभ मराठी

तांत्रिक अडचणींमुळे अनेक शेतकऱ्यांची नोंदणी अपूर्ण

ई-पीक पाहणीसाठी 30 नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ; शेतकऱ्यांना दिलासा



महसूल विभागाकडूनही नोंदणीची सुविधा

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात सुमारे साडेपाच लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यात आली आहे. मात्र, ई-पीक पाहणी नोंदणी प्रक्रियेदरम्यान निर्माण झालेल्या विविध तांत्रिक अडचणींमुळे जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांना आपल्या पिकांची ऑनलाइन नोंदणी करता आलेली नाही. त्यामुळे ई-पीक पाहणीपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. तसेच काही प्रकरणांमध्ये महसूल विभागामार्फत नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खरीप हंगामातील पिकांची सातबारा उताऱ्यावर नोंद करण्यासाठी राज्यभर ई-पीक पाहणी मोहीम राबविण्यात येत आहे. डिजिटल क्रॉप सर्व्हे (डीसीएस) मोबाइल ॲपद्वारे शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची नोंदणी करणे अपेक्षित होते. मात्र, ॲपमधील तांत्रिक अडचणी, सर्व्हर उपलब्ध नसणे, जीपीएस लोकेशनमधील त्रुटी, गावांच्या नकाशातील तफावत तसेच ॲपमध्ये गट क्रमांक उपलब्ध नसणे अशा समस्यांचा शेतकऱ्यांना सामना करावा लागला. परिणामी, अनेक शेतकऱ्यांची ई-पीक पाहणीची प्रक्रिया अपूर्ण राहिली आहे. पीक पाहणीसाठी निश्चित करण्यात आलेली मुदत १० नोव्हेंबर रोजी संपली होती. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे अनेक शेतकऱ्यांना नोंदणी करता आली नसल्याने ही मुदत वाढविण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार महसूल विभागाने ३० नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

डीसीएस ॲपद्वारे नोंदणी शक्य न झालेल्या प्रकरणांमध्ये ग्राम महसूल अधिकारी स्तरावर ई-फेरफार प्रणालीच्या माध्यमातून पीक नोंदणी करण्याचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. यापूर्वी ही सुविधा १० नोव्हेंबरपर्यंत मर्यादित होती. आता ३० नोव्हेंबरपर्यंत ही सुविधा सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी आवश्यक तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. तसेच विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना या प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यास सांगण्यात आले आहे. दुबार पीक नोंदणी होणार नाही, याची दक्षता घेण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. धाराशिव जिल्ह्यात साडेपाच लाख हेक्टरवरील खरीप पिकांची नोंद अचूक आणि पूर्ण होण्यासाठी या मुदतवाढीचा फायदा होणार आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांची अद्याप ई-पीक पाहणी झालेली नाही, त्यांनी ३० नोव्हेंबरपूर्वी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

मुरुडमध्ये २० डिसेंबरला मराठा समाजाचा मोफत वधू-वर परिचय मेळावा

विवाहयोग्य युवक-युवतींना मिळणार एकाच व्यासपीठावर परिचयाची संधी

मुरुड :- मराठा समाजातील विवाहयोग्य युवक-युवतींना विवाह जुळवणीसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सकल मराठा समाज, मुरुड यांच्या वतीने रविवार, दि. २० डिसेंबर २०२६ रोजी भव्य मोफत वधू-वर सूचक परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.मुरुड येथील लातूर-बार्शी रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे हा मेळावा होणार आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून विवाहयोग्य वधू-वरांना एकाच ठिकाणी एकमेकांचा परिचय करून घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच वधू-वरांची शैक्षणिक, कौटुंबिक व वैयक्तिक माहिती जाणून घेऊन योग्य जोडीदार निवडण्यास पालकांनाही मदत होणार आहे. बदलत्या काळात विवाह जुळवताना युवक-युवतींसह पालकांनाही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. ही प्रक्रिया सुलभ व्हावी, समाजातील कुटुंबांमध्ये संवाद व स्नेहबंध वाढावेत आणि योग्य स्थळ शोधण्यासाठी सामायिक व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या सामाजिक हेतूने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे वधू-वरांची नोंदणी पूर्णपणे मोफत असून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. त्यामुळे समाजातील सर्व स्तरांतील कुटुंबांना या उपक्रमात सहभागी होता येणार आहे. मराठा समाजातील विवाहयोग्य युवक-युवतींसह त्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी काळे मामा सेवा केंद्र, आंबेडकर चौक, लातूर-बार्शी रोड, मुरुड येथे संपर्क साधावा. मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अंकुश नाडे, शिवाजी काळे, चंद्रकांत पठाडे, प्रवीण पाटील, अरुण पाटील, रमेश पवार, तानाजी चव्हाण, नामदेव पिंपरे, किरण घुटे, नितीन नागटिळक, सतीश सव्वाशे, संजय भिसे, कैलास बिडवे, हेमलता घुटे यांच्यासह सकल मराठा समाज, मुरुडचे पदाधिकारी व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

पारंपरिक शेतीला फाटा देत एकात्मिक शेतीचा आदर्श

सात एकरांत उभारले पाच शेतीपूरक व्यवसाय; अशोक कुरुंद यांची आर्थिक क्रांती

वर्षाकाठी ४० ते ४५ लाखांचे निव्वळ उत्पन्न, २५ ते ३० जणांना रोजगार

जगदीश गवळी । आरंभ मराठी

कळंब - वडील सालगडी म्हणून काम करायचे, पारंपरिक शेतीतून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणेही कठीण होते; मात्र प्रतिकूल परिस्थितीवर मात करत वाकडी (के) येथील तरुण शेतकरी अशोक उत्तरेश्वर कुरुंद यांनी अवघ्या सात एकरांत शेतीचे अर्थकारणच बदलून टाकले आहे. तरकारी, फुलशेती, कुक्कुटपालन, शेळीपालन आणि दुग्धव्यवसाय अशा पाच व्यवसायांची सांगड घालत त्यांनी एकात्मिक शेतीचा यशस्वी प्रयोग उभा केला. बाजारपेठेचा अभ्यास, पाणी व वीजेचे नियोजन आणि कुटुंबाची साथ यांच्या बळावर सर्व खर्च वजा जाता वर्षाकाठी ४० ते ४५ लाख रुपयांचे निव्वळ उत्पन्न ते मिळवत आहेत. विशेष म्हणजे, त्यांच्या या शेतीतून २५ ते ३० जणांना रोजगार मिळत असून, आता वार्षिक एक कोटींच्या उत्पन्नाचे त्यांचे स्वप्न आहे.

कुरुंद कुटुंबाकडे सात एकर वडिलोपार्जित शेती आहे. मात्र, वडील आणि आजोबांच्या काळापासून पारंपरिक पद्धतीने केली जाणारी शेती कुटुंबाच्या अपेक्षा पूर्ण करू शकत नव्हती. उत्पादन खर्च आणि उत्पन्न यांचा ताळमेळ बसत नसल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. आ ई - व डि लां च या आजारपणामुळे संकट अधिकच गडद झाले होते.

अशा परिस्थितीत पुणे येथे शिक्षण घेतल्यानंतर अशोक यांनी शेतीतच नवे काही करण्याचा निर्धार केला. सुरुवातीला बोअरवेल घेऊन ऊसशेतीचा प्रयोग केला; मात्र त्यातून अपेक्षित फायदा झाला नाही. त्यानंतर त्यांनी बाजारपेठेचा अभ्यास केला. कोणते पीक घ्यावे यापेक्षा बाजारात कोणत्या उत्पादनाला मागणी आहे, याचा विचार करून फुलशेती आणि भाजीपाला लागवडीला सुरुवात केली. त्याला चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर शेतीला पशुपालनाची जोड देत त्यांनी एकात्मिक शेतीचा मार्ग स्वीकारला. या संपूर्ण शेतीप्रयोगात अशोक यांना पत्नी सोनिया, वडील उत्तरेश्वर आणि मुलगा क्रांतिवीर यांची मोलाची साथ मिळते. शेतीतील विविध कामांमध्ये संपूर्ण कुटुंब सहभागी होते. स्वतःच्या कुटुंबाला आर्थिक स्थैर्य मिळवून देतानाच त्यांनी वर्षभरात २५ ते ३० महिला-पुरुषांच्या हाताला रोजगार उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे त्यांच्या शेतीचा फायदा केवळ कुटुंबापुरता मर्यादित न राहता परिसरातील अनेक कुटुंबांपर्यंत पोहोचत आहे.



७५० चौरस फुटांत दोन हजार कोंबड्या

कुक्कुटपालनासाठी त्यांनी अवघ्या ७५० चौरस फूट जागेत हायब्रीड गावरान जातीच्या सुमारे दोन हजार कोंबड्यांचे संगोपन सुरू केले आहे. ७५ ते ८० दिवसांत पक्षी विक्रीयोग्य होतात. प्रत्येक पक्ष्याचे सरासरी वजन अडीच ते तीन किलोपर्यंत होते. बाजारात प्रतिकिलो २०० ते २२० रुपये दर मिळतो. एका बॅचमधून अंदाजे १० ते १२ लाख रुपयांची उलाढाल होते. या व्यवसायातून सरासरी दरमहा ३० हजार रुपये, म्हणजेच वर्षाला ३ लाख ६० हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. याशिवाय अंड्यांच्या विक्रीतून दरमहा सुमारे १५ हजार रुपये मिळतात. अशा प्रकारे कुक्कुटपालन आणि अंडी विक्रीतून वर्षाकाठी सुमारे ५ लाख ४० हजार रुपयांचे उत्पन्न मिळत आहे.

खरबूज, टरबूज, टोमॅटोतून एकरी पाच लाखांचा नफा

पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता बाजारपेठेतील मागणीचा अभ्यास करून त्यांनी खरबूज, टरबूज, टोमॅटो यांसह विविध भाजीपाला पिकांची लागवड केली आहे. या तरकारी पिकांच्या माध्यमातून सर्व खर्च वजा जाता एकरी सरासरी पाच लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. वेगवेगळ्या हंगामांत वेगवेगळी पिके घेतल्यामुळे बाजारभावातील चढ-उताराचा परिणाम कमी होतो. एका पिकावर अवलंबून न राहता बाजारपेठेच्या मागणीनुसार पीकपद्धती बदलणे हे त्यांच्या शेतीचे वैशिष्ट्य आहे.

दोन एकरांत झेंडूची फुलशेती; साडेसात लाखांचे उत्पन्न

शेतातील दोन एकर क्षेत्रावर त्यांनी झेंडूची लागवड केली आहे. गेल्या तीन वर्षांपासून ते फुलशेतीचा प्रयोग यशस्वीपणे राबवत आहेत. साडेचार महिन्यांच्या एका हंगामात सरासरी सात ते साडेसात लाख रुपयांचे उत्पन्न मिळते. बाजारपेठेतील मागणी, सण-उत्सवांचा काळ आणि फुलांचे दर यांचा अंदाज घेऊन ते लागवडीचे नियोजन करतात. त्यामुळे फुलशेतीतूनही त्यांना चांगले आर्थिक उत्पन्न मिळत आहे.

एका शेळीपासून ३५ शेळ्यांपर्यंत मजल

शेतीला पूरक व्यवसाय म्हणून सुरू केलेल्या शेळीपालनातही त्यांनी उल्लेखनीय प्रगती केली आहे. सुरुवातीला एका शेळीपासून सुरू झालेला व्यवसाय आज ३५ शेळ्यांपर्यंत पोहोचला आहे. आतापर्यंत त्यांनी १५ मोठ्या बोकडांची विक्री केली असून, प्रत्येक बोकडाला सरासरी सव्वा लाख ते दीड लाख रुपये दर मिळाला आहे. त्यामुळे बोकड विक्रीतून त्यांना मोठी आर्थिक प्राप्ती झाली आहे. शेळीपालनामुळे शेतीला उत्पन्नाचा आणखी एक भक्कम आधार मिळाला आहे.

तीन म्हशींच्या दुधातून वर्षाला ३.६० लाख रुपये

कुरुंद यांच्याकडे तीन म्हशी असून, त्यांच्यापासून सकाळ-संध्याकाळ मिळून दररोज सरासरी १२ ते १५ लिटर दूध मिळते. या दुधाची विक्री करून प्रतिदिन सुमारे एक हजार रुपये उत्पन्न मिळते. म्हणजेच महिन्याला ३० हजार आणि वर्षाला ३ लाख ६० हजार रुपयांचे उत्पन्न मिळते. विशेष म्हणजे, दूध विक्रीची जबाबदारी त्यांचा मुलगा क्रांतिवीर सांभाळतो.

वार्षिक एक कोटींच्या उत्पन्नाचे स्वप्न

शेतीत पाण्याचे योग्य नियोजन करून बहुविध पीकपद्धतीचा अवलंब केला आणि शेतीला कुक्कुटपालन, शेळीपालन व दुग्धव्यवसायाची जोड दिली, तर शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकते. एकाच पिकावर अवलंबून न राहता विविध पिके आणि पूरक व्यवसाय केल्यास बाजारभावातील चढ-उताराचा धोका कमी करता येतो. त्यासाठी बाजारपेठेचा अभ्यास, उपलब्ध पाण्याचा सुयोग्य वापर आणि सातत्यपूर्ण मेहनत आवश्यक आहे. भविष्यात या नावीन्यपूर्ण प्रयोगांचा विस्तार करून वार्षिक एक कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवण्याचे स्वप्न आहे.

अशोक कुरुंद
प्रगतिशील शेतकरी.

26 वर्षांनंतर तुळजाभवानी महाविद्यालयात रंगला माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर येथील तुळजाभवानी कला व वाणिज्य महाविद्यालयातील १९९५ ते २००० या शैक्षणिक कालावधीतील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा तब्बल २६ वर्षांनंतर मोठ्या उत्साहात पार पडला. या मेळाव्याच्या निमित्ताने तब्बल १५० माजी विद्यार्थी मित्र-मैत्रिणी एकत्र आले. अनेक वर्षांनंतर झालेल्या या भेटीमुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळाला, तर महाविद्यालयीन जीवनातील मैत्रीचे बंध पुन्हा घट्ट झाले. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. त्यानंतर प्राध्यापकांची मिरवणूक काढून त्यांचे स्वागत करण्यात आले. मेळाव्याचे उद्घाटन माजी प्राचार्य रमेश दापके, कॅप्टन बागल, प्राचार्य डॉ. जीवन पवार, प्रा. अर्जुन जाधव, प्रा. यशवंत डोके, प्रा. शकुंतला मगर, प्रा. सविता कदम आणि प्रा. धनंजय लोंढे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविकात सचिन घोडके यांनी स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून मैत्रीचे नाते कायम टिकवून ठेवण्याचे आवाहन केले. तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या वतीने महाविद्यालयाच्या विकासासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी उपस्थित माजी विद्यार्थी व मान्यवरांना तुळजाभवानी मातेची प्रतिमा आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तानाजी म्हेत्रे यांनी केले. मेळाव्याच्या यशस्वितेसाठी महेंद्र कावरे, गुलचंद्र व्यवहारे, संजय शिंदे, विष्णू दळवी, लक्ष्मीकांत सुलाखे, सतीश घोगरे, किशोर शिंदे, संजय कामे आदींनी परिश्रम घेतले. यावेळी माजी विद्यापीठ प्रतिनिधी अमर परमेश्वर, प्रकाश मगर, विद्यार्थी संघाचे अध्यक्ष बंडू मुळे, प्रमोद अपराध, राजेश मलबा, सचिन देशमुख, अभिमान खराडे, संजय राठोड, संजय जाधव, सोपान कदम, राणी धर्माधिकारी, मंजुषा पवार यांच्यासह १५० माजी विद्यार्थी उपस्थित होते.

आरळी बुद्रुकच्या जिल्हा परिषद प्रशालेतील २००१-०२ च्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

आरंभ मराठी । तुळजापूर

शिक्षण, नोकरी आणि बदली अशा विविध कारणांमुळे अनेकजण आपले गाव, शाळा आणि बालपणीचे मित्र यांच्यापासून दूर जातात. मात्र, २५ वर्षांनंतर पुन्हा एकदा शालेय मित्रांना एकत्र आणण्याचा अनोखा उपक्रम तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या २००१-०२ च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी राबविला. सोशल मीडियाच्या माध्यमातून मार्च महिन्यापासून वर्गमित्रांचा शोध घेत दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये सुमारे ४० विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला. यानिमित्ताने समूह संवादातून जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. आरळी बुद्रुक येथील जिल्हा परिषद प्रशालेत दहावीपर्यंत शिक्षण घेतलेले विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि त्यावेळचे शिक्षक तब्बल २५ वर्षांनंतर एकत्र आले. यावेळी शालेय जीवनातील गमतीजमती, मित्रांसोबत घालवलेले क्षण आणि सध्याच्या आयुष्यातील अनुभवांची देवाणघेवाण करण्यात आली. अनेकांनी आपल्या मनातील भावना व्यक्त करत जुन्या मैत्रीचा आनंद पुन्हा अनुभवला. मेळाव्यात उपस्थित शिक्षक आणि माजी विद्यार्थ्यांनी आपली ओळख करून देत शिक्षण, नोकरी, व्यवसाय तसेच सध्याच्या कार्यक्षेत्राची माहिती दिली. प्रत्येकाने आपल्या प्रगतीचा आलेख मांडत जीवनातील प्रवास कथन केला. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. या स्नेहमेळाव्यामुळे २५ वर्षांपूर्वीच्या शालेय आठवणींना उजाळा मिळण्यासोबतच जुन्या मैत्रीचे बंध पुन्हा दृढ झाले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. सूत्रसंचालन प्रा. डॉ. अविनाश ताटे यांनी केले, तर आभार ॲड. फारुक शेख यांनी मानले.

पाणीटंचाईने ऊस वाळला; मजुरांअभावी तोडणीही रखडली

वाशी तालुक्यात ऊस उत्पादक शेतकरी दुहेरी संकटात

आरंभ मराठी । वाशी

यंदा झालेल्या अत्यल्प पावसामुळे ऊस उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. एकीकडे पाणीटंचाईमुळे शेतातील उभा ऊस वाळू लागला आहे, तर दुसरीकडे ऊस तोडणीसाठी मजूर उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट निर्माण झाले आहे. पाण्याअभावी आधीच उसाच्या वाढीवर परिणाम झाला असताना, वेळेत तोडणी होत नसल्याने उत्पादनात आणखी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यंदा पावसाने ओढ दिल्याने धरणे, विहिरी आणि कूपनलिकांच्या पाणीपातळीत मोठी घट झाली आहे. ऊस हे अधिक पाण्याची आवश्यकता असलेले पीक असल्याने सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याचा फटका पिकाला बसत आहे. ऐन वाढीच्या काळातच पाणीटंचाई निर्माण झाल्याने अनेक शेतांतील ऊस करपू लागला आहे. उन्हाचा चटका आणि पाण्याची कमतरता यामुळे उसाची वाढ खुंटली असून अपेक्षित उत्पादन मिळण्याबाबत शेतकरी साशंक आहेत. या परिस्थितीत साखर कारखान्यांनी ऊस तोडणी यंत्रे (हार्वेस्टर) उपलब्ध करून द्यावीत, तसेच पाणीटंचाईमुळे वाळत चाललेल्या उसाला प्राधान्याने तोडणी द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. शासनानेही वाशी तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानग्रस्त ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मजुरांअभावी तोडणीची प्रतीक्षा

पाणीटंचाईमुळे वाळत चाललेला ऊस लवकरात लवकर कारखान्याला पाठविण्याची शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे. मात्र, यंदा ऊस तोडणी मजुरांची संख्या कमी झाल्याने अनेक ठिकाणी तोडणीची कामे रखडली आहेत. कारखान्यांकडे तोडणीसाठी पाठपुरावा करूनही वेळेत तारीख मिळत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे. ऊस शेतात अधिक काळ उभा राहिल्यास त्याच्या वजनात घट होऊन आर्थिक नुकसान सहन करावे लागणार आहे. त्यामुळे पाणीटंचाईबरोबरच मजूरटंचाईचे संकट शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी ठरत आहे.

कारखान्यांनी हार्वेस्टर उपलब्ध करावेत

आधीच पावसाने दगा दिल्याने विहिरींनी तळ गाठला आहे. डोळ्यादेखत ऊस वाळत चालला आहे. मात्र, आता ऊस तोडण्यासाठी मजूरही मिळत नाहीत. कारखान्यांकडे वारंवार चकरा मारूनही तोडणीची तारीख मिळत नसल्याने आम्ही पूर्णपणे हतबल झालो आहोत.कारखान्यांनी ऊस तोडणी यंत्रे (हार्वेस्टर) उपलब्ध करून द्यावीत, तसेच पाणीटंचाईमुळे वाळत चाललेल्या उसाला प्राधान्याने तोडणी द्यावी.

अजित संजीवन परडंकर
ऊस उत्पादक शेतकरी.

आरंभ मराठी | रखडलेली रक्कम तातडीने वितरित करण्याची शेतकऱ्यांची मागणी

नमो शेतकरी सन्मान निधीचे दोन हप्ते थकीत;

धाराशिव जिल्ह्यातील २.३५ लाख शेतकऱ्यांना प्रतीक्षा

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आर्थिक आधार ठरणाऱ्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचे दोन हप्ते रखडले आहेत. जिल्ह्यातील तब्बल २ लाख ३५ हजार शेतकरी या योजनेच्या प्रलंबित हप्त्यांच्या प्रतीक्षेत आहेत.

योजनेचा शेवटचा हप्ता २५ मार्च २०२६ रोजी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाला होता. त्यानंतर आठ महिन्यांचा कालावधी उलटूनही पुढील दोन हप्त्यांचे वितरण झालेले नाही.

एकीकडे जिल्ह्यात दुष्काळजन्य परिस्थितीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले असून दुसरीकडे शासनाकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीचे हप्ते रखडल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी अधिकच वाढली आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत पात्र शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये तीन समान हप्त्यांत दिले जातात.

प्रत्येक हप्त्यापोटी दोन हजार रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होतात. मात्र, एप्रिल ते जुलै आणि ऑगस्ट ते नोव्हेंबर या दोन कालावधीतील प्रत्येकी दोन हजार रुपयांचे दोन हप्ते असे एकूण चार हजार रुपये अद्याप मिळालेले नाहीत. जिल्ह्यातील २ लाख ३५ हजार शेतकऱ्यांचे प्रत्येकी चार हजार रुपये गृहीत धरल्यास सुमारे ९४ कोटी रुपयांची रक्कम त्यांच्या खात्यावर जमा होणे बाकी आहे. ही रक्कम वेळेत मिळाली असती तर सध्याच्या आर्थिक अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना मोठा आधार मिळाला असता.



दुष्काळामुळे आर्थिक गणित बिघडले

यंदा धाराशिव जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांना मोठा फटका बसला आहे. जिल्ह्यातील साडेपाच लाख हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली असून उत्पादनात मोठी घट झाली आहे. सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसह अन्य पिकांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. काही भागांत पिके हातची गेल्याने शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही भरून निघाला नाही. पेरणी, खते, बियाणे, कीटकनाशके, मजुरी आणि मशागतीसाठी शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. मात्र, अपेक्षित उत्पन्न न मिळाल्याने आर्थिक नियोजन कोलमडले आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारा नमो शेतकरी सन्मान निधी हा शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा आर्थिक आधार ठरतो. परंतु, दोन हप्ते रखडल्याने या मदतीपासून शेतकरी वंचित आहेत.

९४ कोटींच्या निधीची प्रतीक्षा

या योजनेच्या दोन हप्त्यांचे वितरण प्रलंबित असून, त्यासाठी कृषी विभागाकडून सध्या कुठलीच हालचाल सुरू असल्याचे दिसून येत नाही. एकीकडे शेतकऱ्यांना आर्थिक मदतीची गरज असताना दुसरीकडे त्यांच्या हक्काच्या निधीचे वितरण रखडले आहे. त्यामुळे शासनाने प्रलंबित दोन्ही हप्त्यांची रक्कम तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, तसेच पुढील हप्तेही नियमित वेळेत वितरित करावेत, अशी अपेक्षा धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

सरस्वती विद्यालय, रामेश्वरच्या १९९८ च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा लातूर येथे स्नेहमेळावा



आरंभ मराठी । कळंब

शालेय जीवनातील मैत्रीचे नाते काळाच्या ओघात कधीही धूसर होत नाही, याचा प्रत्यय सरस्वती विद्यालय, रामेश्वर येथील माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्यातून आला. तब्बल २८ वर्षांनंतर १९९८ मध्ये दहावीच्या वर्गात एकत्र शिक्षण घेतलेले वर्गमित्र लातूर येथे एकत्र आले.

यावेळी जुन्या आठवणींना उजाळा देत सर्वांनी शालेय जीवनातील रम्य क्षण पुन्हा अनुभवले. अनेक वर्षांनंतर भेटलेल्या मित्र-मैत्रिणींनी एकमेकांची आस्थेने विचारपूस केली. शाळेतील गमतीजमती, वर्गातील धमाल, शिक्षकांनी केलेले संस्कार, खेळ, सहली आणि मित्रांसोबत घालवलेले अविस्मरणीय क्षण यांची मनमोकळी उजळणी करण्यात आली. प्रत्येक जण आपापल्या व्यवसायात, नोकरीत आणि संसारात व्यस्त असला, तरी मैत्रीचा धागा आजही तितकाच घट्ट असल्याचे या मेळाव्यातून दिसून आले. यावेळी गुरुजनांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करण्यात आला. सखाराम लाड, केंद्रे संजय, सोनवणे विष्णू, जाधव गोविंद, कुलकर्णी प्रदीप, मुंढे सुग्रीव, शेप बालासाहेब, चिलवंत महादेव आणि तानाजी पांचाळ या गुरुजनांचा माजी विद्यार्थ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. हा मेळावा केवळ भेटीगाठींचा कार्यक्रम न ठरता मैत्री, प्रेम, आपुलकी आणि गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा अविस्मरणीय सोहळा ठरला.